Gram: "Dnyanteerth"

**Swami Ramanand Teerth
Marathwada University**

*"Dnyanteerth", Vishnupuri,*

**Nanded - 431 606 (M.S.)**

तार: 'ज्ञानतीर्थ'

**स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ**

*"ज्ञानतीर्थ", विष्णुपुरी,*

नांदेड - 431 606 (महाराष्ट्र)

संदर्भ : परीक्षा/२०११–१२/६८९

दिनांक :— २२.०६.२०११

# :: परिपत्रक ::

या परिपत्रकान्वये सर्व संलग्नीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०११–२०१२ पासून परीक्षा सुधार योजना राबविण्यास मा.परीक्षा मंडळ व मा.विद्यापरिषदेने मान्यता दिलेली आहे. त्यानूसार बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व बी.बी.ए. या अभ्यासक्रमातील शैक्षणिक वर्ष २०११–२०१२ पासून प्रथम वर्षास प्रवेशीत विद्यार्थ्यांना परीक्षा सुधार योजना लागु होणार आहे.

या परीक्षा सुधार योजनेचे स्वरूप, महत्व व प्रक्रीया आणि कार्यपध्दती याची सविस्तर माहिती सोबत जोडण्यात आली आहे. ही बाब महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षेकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांना अवंगत करावी. सदर परीक्षा सुधार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयात स्वतंत्र परीक्षा विभाग निर्माण करावा.

याबाबत सर्व संबंधीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे जेणेकरून नवीन परीक्षा पध्दती यशस्वीपणे राबवीता येईल.

परीक्षा नियंत्रक

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## परीक्षा सुधार योजना

## परिपत्रक ०१/२०११–२०१२

**प्रस्तावना**

शैक्षणिक क्षेत्रात भावी काळात मोठे बदल येवू पाहत आहेत. व्यावसायिक दृष्टिकोनातून शिक्षण क्षेत्राकडे पाहताना आपल्या विद्यार्थ्यांना अधिकाधिक रोजगार संधी उपलब्ध होतील आणि आपले विद्यार्थी त्यास पात्र राहतील याची दक्षता सर्वच विद्यापीठे घेत आहेत. राष्ट्रीय पातळीवर मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणावर या संदर्भात विचारमंथन सुरु झाले आहे. राष्ट्रीय ज्ञान आयोग आणि यशपाल समिती यांचे उच्च शिक्षणाबद्दल अहवाल सादर झाले आहेत. उच्च शिक्षणाच्या संधीसाठी, विद्यार्थ्यांना त्या-त्या संस्थांची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक ठरत आहे. शिक्षक निवड व नियुक्तीसाठी सुध्दा नेट/सेट परीक्षा अनिवार्य झाली आहे. या व इतर स्पर्धा परीक्षा बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्नावर आधारीत तर काही परीक्षा दिर्घोत्तरी प्रश्नावर आधारीत आहेत.

या परीक्षांना आपले विद्यार्थी पात्र होवून यशस्वी ठरण्यासाठी त्यांना अशा प्रकारच्या परीक्षेंचा सराव होणे आवश्यक आहे. उपरोल्लेखीत दोन अहवालामधून विद्यापीठांचे मूळ उद्दिष्ठ साध्य होत नसल्याचे व विद्यापीठे ही परीक्षा केंद्र/मंडळे होत असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे. विद्यापीठ ही ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन, ज्ञान प्रसाराची केंद्रे असणे आवश्यक आहे. विद्यापीठीय परीक्षांचा कालावधी व ताण कमी करण्याबरोबरच शिक्षक विद्यार्थी यांचे परस्पर संबंध वाढवण्यावर आणि संबंधित महाविद्यालयातील शिक्षकांचे उपस्थित दिवसांचे प्रमाण वाढवून ते जास्तीत जास्त अध्यापन कार्यास व महाविद्यालयीन शिक्षण व इतर उपक्रमासाठी उपलब्ध राहावेत यादृष्टीने परीक्षा पध्दतीत सुधारणा करणे आवश्यक आहे. या दृष्टीने विद्यापीठ अनुदान आयोगाने सुचविल्याप्रमाणे परीक्षा कालावधी कमी करुन अध्यापन कालावधी वाढवण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक बनले आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड हे ग्रामीण भागातील विद्यापीठ आहे. हे विद्यापीठ नवनवीन अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांना शैक्षणिक व बौध्दिक दृष्ट्या सक्षम व समृध्द करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. या विद्यापीठांतर्गत येणारे चारही जिल्हे हे औद्योगिक दृष्ट्या अप्रगत आहेत. त्यामुळे या भागात पारंपरिक शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयाची संख्या जास्त आहे. शिक्षणाच्या विस्तारीकरणामुळे व सार्वत्रिकीकरणामुळे ग्रामीण व दुर्गम भागात सुध्दा महाविद्यालयांची संख्या बऱ्यापैकी

वाढली आहे. त्यामुळे या भागातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी अशा पालकांच्या पाल्यांची शिक्षण घेणाऱ्यामध्ये संख्या जास्त आहे. या गरीब व होतकरु विद्यार्थी व विद्यार्थिनींची मानसिकता ही आपल्या गावाजवळील किंवा गावालगत तालुक्यातील महाविद्यालयात शिक्षण घेण्याची आहे. शेतकरी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्याची संख्या जास्त असल्याने कमी शुल्कात मिळणारे शिक्षण तसेच शिक्षण संपवून घरात व शेतात काम करण्यास मदत होईल अशा धारणेने शिक्षण देणाऱ्या पालकांची संख्याही जास्त आहे.

शहरी भागातील काही मोजकी महाविद्यालये सोडली तर इतर महाविद्यालयातही वेगळी स्थिती पहावयास मिळत नाही. तेव्हा सर्व स्तरातील विद्यार्थी व विद्यार्थ्यांना, सुलभ तसेच मानसिकदृष्ट्या तणावमुक्त शिक्षण देणे ही काळाची गरज झाली आहे. विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती वाढवून त्यांना सातत्याने जास्तीत जास्त ज्ञान कसे देता येईल यासाठी शासनाने कांही शैक्षणिक बदल सूचवले आहेत. त्या बदलाचा एक भाग म्हणजेच महाविद्यालयीन पदवी शिक्षणासाठी वार्षिक पध्दती ऐवजी सत्र पध्दतीचा अवलंब केलेला आहे. ही पध्दत विद्यार्थ्यांना सखोल व सविस्तर ज्ञान संपादनासाठी उपयोगी ठरत आहे. परिणामतः ही पध्दत संख्यात्मक विकासापेक्षा बौध्दिक विकासास उपयुक्त ठरली आहे. या शिक्षण पध्दतीत दर सहा महिन्याला विद्यार्थ्यांचे बौध्दिक ज्ञान, कौशल्य इत्यादीचे मूल्यमापन करण्यासाठी परीक्षा घेतल्या जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना वर्षभर अभ्यासात गुंतून राहावे लागते. या सर्व परीक्षा विद्यापीठ स्तरावर होत असल्याने सर्व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी एकच वेळापत्रक द्यावे लागते. परिणामतः ज्या महाविद्यालयात कमी विषय चालतात त्यांना सुध्दा इतरांसाठी सर्वांची परीक्षा होईपर्यंत थांबावे लागते त्यामुळे परीक्षेचा कालावधी दीर्घ काळ चालतो. त्यानंतर उत्तरपुस्तिका मूल्यांकन करुन निकाल प्रक्रिया पूर्ण करावी लागते. परिणामतः निकाल लावण्यास उशीर होतो आणि या कालावधीत शिक्षक महाविद्यालयात उपस्थित राहू शकत नाहीत.

दुसरे सत्र सुरु असते त्याचवेळी पहिल्या सत्राच्या निकालाची प्रक्रिया चालू असते, त्यासाठी लागणारे अध्यापक मुल्यांकन कार्यासाठी गुंतलेले असतात. त्यामुळे विद्यापीठ व महाविद्यालय यांच्यासमोर प्रशासकीय अडचणी निर्माण होतात, त्यामुळे विद्यापीठ केवळ परीक्षा घेणारे केंद्र बनत चालले आहे. ह्या समस्या दूर करण्यासाठी तसेच महाविद्यालय, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यापीठ या सर्व घटकांना सुलभ अशी परीक्षा पध्दत असावी. यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा पध्दतीत सुधारणा करणे गरजेचे आहे. तणावमुक्त शिक्षणासाठी, विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवून परीक्षेची भीती कमी करण्यासाठी, विद्यापीठ परीक्षा सुधार योजना राबवित आहे. सुधारीत परीक्षा पध्दती मुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अध्ययन व प्राध्यापकांना अध्यापनासाठी पूरेसा वेळ मिळेल, विद्यार्थ्यांचा ज्ञानसंपादन प्रक्रियेत सहभाग वाढेल, समृध्द

व सक्षम विद्यार्थी विद्यापीठातून पदवी घेवून बाहेर पडतील. असा विद्यार्थी जागतिक स्पर्धेत टिकून, नवनवीन आव्हाने पेलण्यास समर्थ असेल. व तो योग्य भारतीय नागरीक म्हणून तयार होईल.

मा.विद्या परिषदेने मान्य केल्या प्रमाणे परीक्षा सुधार पध्दती शैक्षणिक वर्ष २०११–१२ पासुन बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व बी.बी.ए. या विद्याशाखांना लागू करण्यात येत आहे.

०१. प्रत्येक वर्षात दोन सत्र असतील. पदवी अभ्यासक्रमासाठी एकूण सहा सत्र असतील.

०२. २०११–१२ या शैक्षणिक वर्षात सद्या अस्तीत्वात असलेलाच अभ्यासक्रम असेल (किरकोळ बदलासहीत)

०३. प्रथम व द्वितीय वर्षात प्रत्येक सेमिस्टरच्या पेपरला एकुण ५० गुण असतील तर तृतीय वर्षात (सेमिस्टर ५ व ६ करीता) प्रत्येक पेपरला एकुण १०० गुण असतील.

- ५० गुणांपैकी ४० गुण हे बहुपर्यायी (MCQ) प्रश्नासाठी असतील व १० गुण अंतर्गत मुल्यमापनासाठी असतील.
- ४० गुणांची बहुपर्यायी (MCQ) प्रश्नांची परीक्षा विद्यापीठ पातळीवर घेण्यात येईल.

०४. प्रथम व द्वितीय वर्षातील द्वितीय भाषा, अनिवार्य इंग्रजी व वाणिज्य विद्याशाखेच्या यु.जी.सी. व्होकेशनल व संख्यात्मक स्वरुपाच्या विषयासाठी प्रत्येकी, बहुपर्यायी प्रश्न (MCQ) ३० गुणांचे असतील व २० गुण अंतर्गत मुल्यमापनासाठी असतील.

०५. १० गुणाचे (२० गुणांची द्वितीय भाषा वगैरेसाठी) अंतर्गत मुल्यमापन करणेसाठी महाविद्यालय स्तरावर ३० गुणांच्या सत्रनिहाय दोन परीक्षा (साधारण १० मार्कांचे तीन प्रश्न) घेण्यात याव्यात. दोन परीक्षांच्या गुणांची सरासरी करुन ते गुण १० गुणांमध्ये (२० गुणांमध्ये) परिवर्तीत करावे. ही परीक्षा केवळ दिर्घोत्तरी स्वरुपाचीच असेल. पहिली परीक्षा साधारणतः सत्राच्या मध्यावर (५० टक्के अभ्यासक्रमावर आधारित) व दुसरी परीक्षा उरलेल्या अभ्यासक्रमावर, सर्व अभ्यासक्रम संपल्यानंतर, घेण्यात यावी.

०६. तृतीय वर्षाच्या दोन्ही सत्र परीक्षा हया दिर्घोत्तरी स्वरुपाच्या असतील. एकूण १०० गुणाचे पेपर असतील त्यापैकी ८० गुणासाठी विद्यापीठ पातळीवर दिर्घोत्तरी परीक्षा होईल व २० गुण अंतर्गत मुल्यमापनसाठीचे असतील.

- अंतर्गत मुल्यमापनासाठीच्या २० गुणासाठी बहुपर्यायी परीक्षा किंवा प्रकल्प असावे.

०७. अंतर्गत गुण यादी विद्यापीठ परीक्षा सुरु होण्याअगोदर विद्यापीठात सादर करणे अनिवार्य असेल. त्यानंतर कोणत्याही सबबीवर गुण यादी स्विकारली जाणार नाही.

०८. प्रत्येक पेपर्समध्ये पास होण्यासाठी विद्यापीठा मार्फत होणा-या परीक्षेत ४० टक्के गुण (उदा. ३० पैकी १२,४० पैकी १६, ८० पैकी ३२) आणि एकुण गुणांच्या (विद्यापीठ + अंतर्गत मुल्यमापन) ४० टक्के (उदा. ५० पैकी २०, १०० पैकी ४०) गुण आवश्यक राहतील.

०९. ज्या विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण विद्यापीठास प्राप्त झाले नाहीत त्यांना ०० (शुन्य) गुण दर्शवुन निकाल जाहिर केला जाईल. त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची असेल. अत्यंत अपवादात्मक परीस्थितीत मा.कुलगुरुंच्या विशेष अधिकारात अर्थिक दंड आकारुन त्यांचे अंतर्गत गुण स्विकारले जातील.

१०. उत्तीर्णतेचे, ए.टी.के.टी. चे, युटीचे (अंडर टेकींग) व अतिरिक्त गुणांसाठीचे प्रचलित नियम लागू राहतील.

टिप : विद्यापीठ परीक्षेत ४० टक्के तसेच अंतर्गत व विद्यापीठ परीक्षा मिळून एकुण गुणांच्या ४० टक्के गुण मिळाल्यास विद्यार्थी त्या विषयात उत्तीर्ण समजला जाईल. नापास झाल्यास, विद्यार्थ्यास फक्त विद्यापीठ परीक्षा देवूनच एकुण गुणांच्या किमान ४० टक्के गुण (पूर्वीचे अंतर्गत मुल्यमापनाचे गुण धरुन) प्राप्त करावे लागतील. पास झालेल्या विद्यार्थ्यास कोणत्याही परिस्थितीत अंतर्गत मुल्यमापनाची फेरपरीक्षा देता येणार नाही. तथापी नापास झालेल्या विद्यार्थ्यास अंतर्गत मुल्यमापनासाठीची परीक्षा देण्याची इच्छा असल्यास पुढील शैक्षणिक वर्षात नियमित विद्यार्थ्यांबरोबर अंतर्गत मुल्यमापनाच्या दोन परीक्षा घेवून अंतर्गत मुल्यमापनाचे गुण नव्याने देता येतील.

११. प्रथम व द्वितीय वर्षाकरिता विद्यापीठ हिवाळी सत्रात केवळ प्रथम व तृतीय सत्राची परीक्षा घेतली जाईल व उन्हाळी सत्रात केवळ द्वितीय व चतुर्थ सत्राची परीक्षा विद्यापीठामार्फत घेतली जाईल.

तृतीय वर्षाच्या (सेमिस्टर ५ व सेमिस्टर ६) च्या परीक्षा हिवाळी व उन्हाळी दोन्ही सत्रात घेतल्या जातील.

१२. प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ सत्राच्या सुधारित परीक्षा पध्दतीप्रमाणे घेण्यात येणारी पुनर्परीक्षा ही उन्हाळी परीक्षेनंतर साधारणपणे दिड महिन्यानंतर विद्यापीठामार्फत घेण्यात येईल.

१३. पूनर्परीक्षेसाठीचे परीक्षासाठीचे केंद्र जिल्हाच्या ठिकाणी असतील (गरजेनुसार यात वाढ करण्यात येईल.)

१४. प्रथम व द्वितीय वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षा पूर्वीच्या परीक्षा पध्दतीप्रमाणेच घेण्यात येतील; तथापी तृतीय वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी दोन्ही परीक्षक बहिस्थ असतील.

१५. अंतर्गत मुल्यमापनाचे संपूर्ण अभिलेख Record साधारणपणे एक वर्ष जपून ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक महाविद्यालयात स्वतंत्र परीक्षा विभाग स्थापीत करणे आवश्यक आहे.

१६. प्रत्येक सत्रात अंतर्गत मुल्यमापन रेकॉर्ड तपासण्यासाठी स्थानिक पातळीवर (किंवा नजीकच्या महाविद्यालयातून) गरजेनुसार निरीक्षक पाठविले जातील.

अशा तपासणीत एखादे महाविद्यालय दोषी आढळून आल्यास त्यांना ३२ (६) समितीच्या माध्यमातून आर्थिक दंड आकारले जाईल.

१७. MPSC च्या धरतीवर MCQ परीक्षेत नकारात्मक गुण पध्दत (Negative Mark System) असेल. प्रत्येक 4 (चुकीच्या) उत्तरास (Incorrectly answer) 1 गुण कमी केला जाईल. अपुर्णांकातील नकारात्मक गुण हे मागील (Lower Integer) पुर्णांकात रुपांतरीत केले जातील. जसे -

| Nos. of incorrectly answered MCQ's | Negative marks | Negative after rounding up |
|---|---|---|
| 1 | 0.25 | 0 |
| 2 | 0.50 | 0 |
| 3 | 0.75 | 0 |
| 4 | 1.00 | 1 |
| 5 | 1.25 | 1 |
| 6 | 1.50 | 1 |
| 7 | 1.75 | 1 |
| 8 | 2.00 | 2 |

१८. बहुपर्यायी प्रश्नपत्रीका ही चार संच स्वरुपात असेल (Version A,B,C,D) स्वरुपात असेल.

- बहुपर्यायी प्रश्नपत्रीका सोडविणेसाठी .OMR Sheet देण्यात येईल.
- OMR Sheet वर काळया शाईचाच वापर करावा.
- एका पेपरसाठी एक अशी स्वतंत्र OMR Sheet देण्यात येईल.
- विद्यापीठाची बहुपर्यायी परीक्षा संपल्यानंतर लगेच विद्यापीठ वेबसाईटवर प्रश्नांची उत्तरे (Answer Key) ठेवण्यात येतील.

१९. अंतर्गत मुल्यमापन चाचण्यासाठी महाविद्यालयाने साधारणपणे छापील स्वरुपात प्रश्नपत्रीका व उत्तरपत्रीका उपलब्ध करुन द्याव्यात.

अंतर्गत मुल्यमापन चाचण्या संपल्यानंतर तपासणी करुन प्राप्त गुण विद्यार्थ्यास दर्शवून त्यांचे रेकॉर्ड ठेवावे.

२०. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी विद्यापीठाच्या प्रचलित नियमाप्रमाणे मानधन दिले जाईल.

२१. अंतर्गत मुल्यमापनाच्या उत्तरपुस्तीका व प्रश्नपत्रीका छपाईसाठी व परीक्षा आयोजनासाठी, महाविद्यालयात एकूण जमा होणा—या परीक्षाशुल्काच्या २५ टक्के रक्कम विद्यापीठ संबंधित महाविद्यालयास परत करेल, तथापी अंतर्गत मुल्यमापन रेकॉर्ड तपासण्यासाठी नेमलेल्या बहिस्थ समितीने कांही आक्षेप घेतल्यास ३२ (६) समितीच्या निर्णयानंतरच परतावा करण्यात येईल. या समितीने दंड आकारल्यास दंडाची रक्कम २५ टक्के रक्कमेतून विद्यापीठ वसूल करेल.

२२. बहुपर्यायी परीक्षेसाठी विद्यापीठाचा सह.केंद्रप्रमुख पाठविला जाईल.

बहुपर्यायी परीक्षा संपल्यानंतर उत्तर पत्रीका (OMR Sheet) लगेचच सिलबंद करण्यात येतील. उशीरा व दुस—या दिवशी सिल केलेले पॉकेटस असल्यास दोषीवर नियमानुसार कार्यवाही केली जाईल. सिल केल्यानंतर CS, JCS, ACS यांची स्वाक्षरी आवश्यक आहे, त्याशिवाय विद्यापीठ उत्तर पत्रीकेचे पॉकेट स्विकारणार नाही.

२३. परीक्षा संपल्यानंतर त्याच दिवशी जिल्हास्तरावर सिलबंद उत्तरपत्रीकांचे संकलन केले जाईल.

२४. OMR पध्दतीने तपासणी केल्यानंतर जर एखाद्या विद्यार्थ्यास कांही शंका असतील तर त्यास ५० रुपये शुल्क भरुन गुणपडताळणी करुन दिली जाईल.

२५. परीक्षा सुधार योजना यशस्वी होण्यासाठी प्राध्यापकांनी जबाबदारीने व निर्भिडपणे अंतर्गत मुल्यमापनाचे काम करणे अपेक्षित आहे. त्यासाठी प्राध्यापकांना सर्व पातळीवर विद्यापीठ प्रशासन सहकार्य व संरक्षण देईल.

- **नवीन परीक्षा पध्दती अंमलात आणल्यानंतर होणारे लाभ -**
- प्रथम वर्षातून तृतीय वर्षात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खूपच कमी असल्याने विद्यार्थी गळतीचे प्रमाण (Dropout ratio) कमी होण्यास मदत होईल व त्यामुळे सकल नोंदणी प्रमाण Gross Enrollment ratio वाढेल.
- कमी कालावधीत परीक्षा संपल्यामुळे विद्यार्थ्यांना इतर अभ्यासास वेळ देता येईल.
- अंतर्गत मूल्यमापन सातत्याने होत असल्याने विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा संपर्क वाढेल.
- परीक्षेसाठी व परीक्षेसंबंधीत कामासाठी विद्यापीठाशी करावा लागणारा पत्रव्यवहार कमी होईल व पत्रव्यवहार वेळेवर न पोहोचल्याने होणारी अडचण टळेल.
- यु.जी.सी. च्या निर्देशाप्रमाणे विद्यार्थ्यांचे अधिकचे मूल्यमापन होवून अध्ययन आणि अध्यापनाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल.
- महाविद्यालयीन व विद्यापीठीय प्रशासनात सुलभता येईल.
- विद्यापीठ पातळीवर वस्तुनिष्ठ पध्दतीनुसार परीक्षा होत असल्याने विद्यार्थ्यांना भविष्यात MPSC, UPSC, NET, SET, JRF इ. सारख्या स्पर्धा परीक्षा देण्यास उपयुक्त ठरेल.
- देशपातळीवरील नामवंत शैक्षणिक संस्थेत उच्च शिक्षणसाठी प्रवेश देतांना मुख्यत्वे MCQ पद्धतीने प्रवेश परीक्षा असल्याने अशा संस्थात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी नवीन परीक्षा पद्धती उपयुक्त ठरेल.

नांदेड
दिनांक 20/06/2011

परीक्षा नियंत्रक